
# १२. पुन्हा एकदा

**प्रतिमा इंगोले** (१९५३) : ग्रामीण कथाकार, कवयित्री. 'हजारी बेलपान', 'अकसिदीचे दाने', 'सुगरनचा खोपा', 'जावयाचं पोर' इत्यादी कथासंग्रह; 'भुलाई' हा कवितासंग्रह; 'बुढाई' ही कादंबरी प्रसिद्ध. अस्सल वैदर्भी बोलीचा प्रभावी वापर हे त्यांच्या लेखनाचे खास वैशिष्ट्य आहे.

नवनिर्माणाचा ध्यास घेतलेल्या मनाच्या भावस्थितीचे वर्णन प्रस्तुत कवितेत कवयित्रींनी केले आहे.



*पुन्हा एकदा*
*चमकावी वीज*
*उतरावी खाली*
*भिनावी रक्तात*
*पेटावे स्नायू*
*करीत पुकार*
*पुन्हा एकवार*

*पुन्हा एकदा*
*घालीत पिंगा*
*पावसाच्या सरी*
*व्हाव्यात बेभान*
*कोसळाव्या खाली*
*मातीत माती*
*व्हावी एक...*
*पुसून टाकीत*
*भेदाभेद...*
*पुन्हा एकवेळ...*

*पुन्हा एकदा*
*घुमावा वारा*
*युवक इथला*
*भारला जावा*
*भुलावी तहान*
*विसरावी भूक*
*नवनिर्माणाची*
*लागावी चाहूल*
*उजळावी भूमी...*
*दिगंतात...*
*पुन्हा एकदा...*

## स्वाध्याय

**प्र. १. कवयित्रीला असे का म्हणावेसे वाटते? ते लिहा.**

(१) पावसाच्या सरी कोसळाव्यात, कारण ....................................

(२) भुलावी तहान विसरावी भूक, कारण ..........................................

**प्र. २. खालील घटनांचे कवयित्रीला अपेक्षित परिणाम लिहा.**

| गोष्टी | परिणाम |
|---|---|
| (१) वीज चमकणे. | |
| (२) वारा घुमणे. | |

**प्र. ३. खालील प्रतीके व त्यांचा अर्थ यांच्या जोड्या लावा.**

| 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|
| (१) वीज रक्तात भिनावी | (अ) सर्वत्र भारत भूमी चमकावी |
| (२) मातीत माती एक व्हावी | (आ) समाजातील भेदभाव नष्ट व्हावे |
| (३) नवनिर्माणाची चाहूल लागावी | (इ) मातीने भेदभाव विसरावा |
| (४) पुसून टाकीत भेदभाव | (ई) माणसांत उत्साह निर्माण व्हावा |
| (५) उजळावी भूमी दिगंतात | (उ) नवनवीन गोष्टीची निर्मिती करण्याची इच्छा व्हावी |

**प्र. ४. भावार्थाधारित.**

'मातीत माती व्हावी एक, पुसून टाकीत भेदाभेद' या काव्यपंक्तीतील सामाजिक आशय स्पष्ट करा.

**प्र. ५. अभिव्यक्ती.**

(१) आपल्या देशात शांतता निर्माण व्हावी यासाठी 'पुन्हा एकदा' काय व्हावे असे तुम्हांस वाटते, ते स्वतःच्या शब्दांत सविस्तर लिहा.

(२) कवितेचा तुम्हांला समजलेला भावार्थ स्पष्ट करा.

## अपठित गद्य आकलन.

- **खालील उतारा काळजीपूर्वक वाचून त्याखालील कृती करा.**

**प्र. १. चौकटी पूर्ण करा.**

(अ) झेंड्याचा पांढरा रंग गुणांचा निदर्शक [ ]

(आ) झेंड्याचा केशरी रंग गुणांचा निदर्शक [ ]

(इ) झेंड्याचा हिरवा रंग गुणांचा निदर्शक [ ]

आपल्या झेंड्याचा मधला भाग पांढरा आहे. त्याचा अर्थ काय? पांढरा रंग प्रकाशाचा सत्याचा व साधेपणाचा निदर्शक आहे आणि त्यावरील अशोकचक्र काय सांगते? ते सद्गुणांची, धर्माची खूण सांगते. या झेंड्याखाली काम करताना आपण धर्ममय राहू, सत्यमय राहू असा त्याचा अर्थ आहे. आपल्या वर्तनाची ही सूत्रे राहू देत. या चक्राचा आणखी काय अर्थ आहे? चक्र म्हणजे गती. हे चक्र सांगते, की गतिमान राहा. केशरी रंग त्यागाचा व नम्रतेचा निदर्शक आहे आणि हिरवा रंग म्हणजे हरितश्यामल भूमातेचा. या ध्वजाखाली उभे राहून सेवावृत्तीने व निरहंकारीपणाने आपण पृथ्वीवर स्वर्ग निर्मूया.

**प्र. २. झेंड्यातील अर्थपूर्णता स्वभाषेत स्पष्ट करा.**

# व्हेनिस (स्थूलवाचन)

**रमेश मंत्री – रमेश राजाराम मंत्री** (१९२५-१९९८) : कथाकार, प्रवासवर्णनकार, विनोदी लेखक. 'थंडीचे दिवस', 'सुखाचे दिवस', 'नवरंग' इत्यादी प्रवासवर्णने प्रसिद्ध. १९७९ साली एकाच वर्षात ३४ पुस्तके प्रकाशित करण्याचा विक्रम त्यांच्या नावावर आहे.

'व्हेनिस' या पाण्यावर तरंगणाऱ्या शहरातील वातावरण, हवामान, निसर्गसौंदर्य व जीवनमान, या सर्वांचे वर्णन प्रस्तुत पाठात लेखकांनी केले आहे.

व्हेनिस हे त्या गाडीचे अखेरचे स्टेशन होते. त्यामुळे रेल्वेचे दोन नोकर 'ऑल आऊट' असे इंग्रजीतून आणि त्याच अर्थी इटालियन व फ्रेंचमधून ओरडत डब्या-डब्यांतून फिरत होते. त्या अमेरिकन म्हाताऱ्यांजवळ चिकार सामान होते. व्हेनिसला बिऱ्हाड बदलायच्या इराद्यानं आल्यासारखे, त्यामुळं त्यांनी दोन पोर्टर्स बोलावले. मी त्या स्त्रियांचे औपचारिक आभार मानून माझी छोटी बॅग घेऊन निघालो. स्टेशनच्या बाहेर येऊन पाहतो तर रस्ता नव्हताच ! होता तो एक प्रचंड कालवा, एखाद्या विस्तीर्ण नदीसारखा. हाच तो ग्रँड कॅनॉल. त्यात अनेक पॉटर टॅक्सी म्हणजे लहान मोटर लाँचीस आणि मोठ्या यांत्रिक नावा उभ्या होत्या. 'व्हेनिझिया-व्हेनिझिया, पियाझा-पियाझा' असा त्यांचा पुकार चालला होता. टॅक्सीपेक्षा बस स्वस्त पडणार हे सांगायला काही अर्थतज्ज्ञ लागत नाही. मी अडीचशे लिरांचे बोटीचे तिकीट काढले. दोनएकशे प्रवासी पोटात घेऊन आमची नाव जोरात निघाली.

ते वातावरण अतिशय प्रसन्न होते. विशाल कालव्यावर अनेक उत्साही प्रवासी वेगाने जा-ये करत होते. हायवेवर वाहनांची वाहतूक चालावी तशी त्या जलमार्गावर नावांची धावपळ चालली होती. अनेक प्रकारच्या नावा कालव्यातून चालल्या होत्या. हवेत गारवा होता, वाऱ्यात उत्साह होता, मनात संगीत होते आणि सभोवार पसरलेल्या पाण्यात तारुण्य होते. रोमला भेटलेला एक इटालियन लेखक मला म्हणाला होता ते खरेच होते. 'व्हेनिस हे जगातलं एकच असं शहर आहे, की त्याचं वर्णन करता येत नाही. तिथं प्रत्यक्षात गेलं पाहिजे. तिथली हवा खाल्ली पाहिजे. तिथं राहिलं पाहिजे. तरच तुम्हांला व्हेनिस म्हणजे काय ते समजेल.'

कारण हे पाण्यातले असे जगातले एकमेव अद्भुत शहर आहे. ज्या शहरात एकही मोटार नाही. वाहतूक नियंत्रण करणारा पोलीस नाही. ट्रॅफिक लाईट्स नाहीत आणि रस्त्यावर धक्काबुक्की नाही असे हे जगातले एकमेव शहर, कारण याला खऱ्या अर्थाने रस्तेच नाहीत. आहेत ते कालवे-फक्त कालवे आणि त्यांना जोडणारे पूल. आईच्या गळ्यात मुलाने हात टाकावा तसे हे पूल. लाडिक, प्रेमळ. हा गाव म्हणजे रूढ अर्थाने शहर नव्हेच, तर अनेक छोट्या बेटांचा हा पुंजकाच आहे. निळ्या मखमली सागरावर टाकलेल्या हिऱ्यामाणकांच्या ढिगासारखा हा लांबून दिसतो. मधूनच चर्च किंवा जुना राजवाडा यांची टोके आभाळात घुसतात. ग्रँड कॅनॉलच्या किनाऱ्यावर खुर्च्या टाकलेल्या. चार खुर्च्यांच्या मध्ये टेबल आणि त्यावर रंगीबेरंगी प्रचंड छत्री. या खुर्च्यांवर बसून कॉफी घेत समोरून सरकणाऱ्या विविध आकारांच्या आणि अनंत प्रकारांचे उतारू वाहून नेणाऱ्या नावांची ये जा पाहत बसायचे. तीच गंमत या नावांतून प्रवास करणाऱ्यांनाही पाहायला मिळते. डेकवर येऊन किनाऱ्यावरच्या निरुद्योगी संथ, शांत, चित्रविचित्र प्रवाशांच्याकडे पाहत पुढेपुढे सरकायचे. हे शहर निरुद्योग्यांसाठीच आहे यात शंका नाही, कारण इथे येणाऱ्या प्रवाशांना कसलीही घाई गर्दी नसते. न्यूयॉर्क, मुंबई, हाँगकाँग अशा शहरांतल्या धावपळीपासून हे निवांत शहर सर्वस्वी अलिप्त आहे.

व्हेनिसचे रस्ते म्हणजे पाणरस्ते असतात याची कल्पना नसलेला एक मुनीम एकदा लंडनहून व्हेनिसला विमानाने आला. रस्त्यावर सगळीकडे पाणीच पाणी झालेले पाहून त्याने आपल्या मालकाला तार केली, ''व्हेनिसमध्ये पूर आला आहे. सगळे रस्ते पाण्यानं तुडुंब आहेत. परत येऊ की पूर ओसरेपर्यंत वाट पाहू ते कळवा !''

व्हेनिस म्हणजे अफाट जलदर्शन ! व्हेनिस म्हणजे केवळ कालव्यांचेच नव्हे तर कालव्यातही तरंगणारे शहर ! एक प्रचंड उत्साह आणि उत्सव ! दोन दिवसांच्या निवांत मुक्कामानंतर हे गोड, कलासक्त आणि निळ्या पाण्यावर तरंगणारे शहर सोडताना मनाला खूपच हुरहुर वाटली.

❖❖❖

## स्वाध्याय

**प्र. १. टिपा लिहा.**

(१) ग्रँड कॅनॉल (२) व्हेनिसच्या स्टेशन बाहेरचा परिसर

**प्र. २. खालील मुद्द्यांच्या आधारे व्हेनिसचे वर्णन लिहा.**

(अ) व्हेनिस म्हणजे अफाट जलदर्शन.

(आ) व्हेनिस म्हणजे अवर्णनीय शहर.

**प्र. ३. खालील संकल्पना स्पष्ट करा.**

(अ) व्हेनिस म्हणजे हिऱ्या-माणकांच्या ढिगासारखा बेटांचा पुंजका..............

(आ) व्हेनिस म्हणजे अद्‌भुत शहर ..............

**प्र. ४. 'व्हेनिस हे पाण्यातले जगातले एकमेव शहर आहे', पाठाच्या आधारे या विधानाची सत्यता पटवून द्या.**

**प्र. ५. तुम्हांला आवडलेल्या कोणत्याही एका स्थळाचे वर्णन तुमच्या शब्दांत करा.**

## भाषाभ्यास

### विरामचिन्हे

*** खालील वाक्ये वाचा व अभ्यासा.**

(१) आवडले का तुला हे पुस्तक

(२) हो जेवणानंतर मी सर्व गोष्टी वाचणार आहे जया म्हणाली

(३) वडील म्हणाले ज्ञानेश्वरी कुणी लिहिली तुला ठाऊक आहे का

वरील संवाद वाचताना वाक्य कुठे संपते, प्रश्न आहे की उद्गार आहे, हे काहीच कळत नाही कारण या वाक्यात विरामचिन्हे नाहीत. बोलताना काही विधाने करताना, प्रश्न विचारताना, आश्चर्य, हर्ष, क्रोध आदी भावना व्यक्त करताना माणूस त्या त्या ठिकाणी कमी अधिक वेळ थांबतो, म्हणून तोच आशय लिहून दाखवताना वाचकालाही कळावा, यासाठी विरामचिन्हांचा वापर केला जातो.

*** वरील वाक्यातील चिन्हे आणि त्यांची नावे यांचा तक्ता तयार करा.**

| विरामचिन्हे | नावे |
|---|---|
| | |
| | |
| | |